जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३२४ दिनांक - ०३/०५/२०२३**

## विमानतळ पोलिस स्टेशन पुणे शहर

## खंडणी उकळण्यासाठी व्यवसायिकाला मारहाण करुन पसार झालेले गुन्हेगार जेरबंद

विमानतळ पोलीस ठाणेचे हददीत विमाननगर भागात "काकाचा चहा" दुकानाचे व्यावसायिक यातील फिर्यादी हे दिनांक १८/०४/२०२३ रोजी सकाळी १०/०० वा चे सुमारास त्यांचे गंगापुरम सोयायटी समोर असलेले चहाचे दुकानात हजर असताना तीन इसमांनी चहाचे दुकानात जाऊन फिर्यादी यांना लोखंडी हत्याराचा धाक दाखवुन खंडणीची मागणी करुन फियादी यांना बेदम मारहाण करुन पळ काढला, सदर बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन विमानतळ पोलीस ठाणे पुणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर आरोपींतांचा विमानतळ पोलीस ठाणेचे तपास पथक पोलीस ठाणे हददीत शोध घेत असताना पोलीस अंमलदार दादासाहेब बर्डे, नाना कर्चे व योगेश थोपटे,यांना सदरचे आरोपी हे म्हाडा कॉलनीचे जवळ असलेले मोकळे मैदानात विमाननगर पुणे येथे आल्याची बातमी मिळाली होती. तपास पथकाचे प्रभारी अधिकारी श्री.रविंद्र ढावरे पोलीस उप निरीक्षक यांना सदरची माहिती दिली असता त्यांनी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विलास सोंडे यांना कळविली,त्यांनी शहानिशा करुन कारवाई करण्याचे आदेश दिल्याने पोलीस उप निरीक्षक ढावरे यांनी तपास पथकातील स्टाफसह यातील आरोपी यांना सापळा लावुन शिताफिने ताब्यात घेतले असुन त्यांची नावे १) रोहित नागेश कोळी वय २२ वर्षे रा.संजय पार्क गल्ली नं.३ न्यु एअरपोर्ट रोड लोहगाव पुणे २) सोमनाथ दिपक गायकवाड वय २१ वर्षे रा.गल्ली नं.५ संजयपार्क विमाननगर पुणे अशी आहेत, आरोपीतांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. दाखल गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक वाकडे हे करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उपायुक्त परि ४ पुणे शहर, श्री.शशिकांत बोराटे, मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग पुणे शहर,श्री किशोर जाधव यांचे आदेशान्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर श्री.विलास सोंडे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती संगीता माळी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक रविंद्र ढावरे पोलीस अमलदार अविनाश शेवाळे,सचिन कदम, सचिन जाधव,गिरीष नाणेकर,अंकुश जोगदंडे,नाना कर्चे,योगेश थोपटे,दादासाहेब बर्डे,ज्ञानेश्वर आवारी यांचे पथकाने केली आहे.